PARLE MAHOTSAV
Organiser - **MLA ADV. PARAG ALAVANI,** President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. ३०.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

# पार्ले महोत्सवात दुलर्क्षित समाजाला सुसज्ज व्यासपीठ

मुंबई : पार्ले महोत्सव हा केवळ मुंबई-ठाणे परिसराचा राहिलेला नाही. पार्लेमहोत्सवाच्या व्यासपीठावर आता अनेक कलाकारांना आणि क्रिडापटूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळालेली आहे. परंतु १५ व्या पार्लेमहोत्सवाने अनेक उच्चांक गाठत असतानाच राज्यातील दुलर्क्षित समाजालादेखील सुयोग्य संधी मिळवून दिली आहे, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे आम्ही प्रयत्न केले आहेत, असे प्रतिपादन या महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी केले आहे. कला-क्रिडा महोत्सवाच्या अखेरच्या टप्प्यात ते बोलत होते.

यावर्षीच्या पार्ले महोत्सवात भटके विमुक्त संघ, एकलव्य आश्रमशाळा, यमगर वाडी, सोलापूर येथून २२ मुले-मुली आल्या होत्या. त्यांनी या स्पर्धेतील बुद्धीबळ, मल्लखांब, मॅरेथॉन, नेमबाजी, गोळाफेक अशा मैदानी आणि बैठ्या खेळांसोबतच समूहनृत्यासारख्या कलाविष्कारातही सहभाग घेतला. केवळ सहभागच घेतला नाही तर त्यांनी या खेळांत आपले कौशल्यही दाखवले. बुद्धीबळसारख्या स्पर्धेत या संघातील रेखा सावंत या तरुणीने नवव्या फेरीपर्यंत कडवी चुरस दिली.

१५व्या पार्ले महोत्सवाच्या एकेका स्पर्धेचा बक्षीस समारंभ पाड पडत गेला आहे. नवव्या दिवशी समुह नृत्य स्पर्धांची उपान्त्य फेरी झाली. विविध वयोगटातील चमूंनी आपल्यातील कला तर दाखवलीच परंतु शरीराची लवचिकता, धाडस आणि एकमेकांशी असलेले समन्वय यांचाही सुरेख मिलाफ दिसून आला.

---

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.